महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक- १४४२(अ)/मशिसेमविप/२०१७/२४ दिनांक - १४ फेब्रुवारी, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब मर्यादित विभागीय परीक्षा-२०१७ या परीक्षेस उपस्थित उमेदवारांकडून दिव्यांगत्वाचे विकल्प मागविण्याबाबत**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ४०/२०१७, दिनांक १७ मे, २०१७**

महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब मर्यादित विभागीय परीक्षा-२०१७ परीक्षेकरीता दिनांक १७ मे, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन परिपत्रकामध्ये दिव्यांगांकरीता आरक्षण विहित करण्यात आले नव्हते. तथापि, प्रस्तुत शासन परिपत्रकातील २.२ मध्ये 'वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे', अशी तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार शासनाकडून दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत परीक्षेकरीता विहित करण्यात आलेल्या १२३ पदांपैकी ०६ पदे दिव्यांगांकरीता आरक्षित ठेवणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. सदर पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| गट | दिव्यांगत्वाचा प्रकार | दिव्यांग आरक्षणाचा सुयोग्य उपप्रकार | आरक्षित पदे | |
|---|---|---|---|---|
| | | | **महाराष्ट्र शिक्षण सेवा** | **जिल्हा तांत्रिक सेवा** |
| (अ) | अंध/अल्प दृष्टी | B, LV | १ | १ |
| (ब) | कर्ण बधिरता अथवा एकू येण्यातील दुर्बलता | D, HH | १ | १ |
| (क) | अस्थिव्यंगता/ मेंदूचा पक्षाघात/ कुष्ठरोग मुक्त/ शारीरिक वाढ खुंटणे/ आम्ल हल्लाग्रस्त | OA, BA, OL, BL, CP, LC, Dw, AAV | -- | १ |
| (इ) | बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | MD involving above types, SLD, MI | -- | १ |

२. शासनाकडून कळविण्यात आल्यानुसार प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या व दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी आयोजित परीक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांना दिव्यांग आरक्षणाच्या अनुषंगाने विकल्प (दावा), दिव्यांगत्वाचा प्रकार इत्यादी तपशील सादर करण्यासाठी आयोगाच्या **https://mpsc.gov.in** या संकेतस्थळावरील "Online Facilities' या सदराखाली '**Divyang Claims for Adv.40/2017**' येथे वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात

येत आहे. दिव्यांगत्वाचा विकल्प व इतर तपशील सादर करण्यासंदर्भात पात्र उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) अर्जामध्ये नमूद केलेला मोबाईल क्रमांक नोंदवून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा OTP प्रविष्ट करून लॉगिन करावे.

(२) उमेदवार दिव्यांगत्वाचा कोणता प्रकार धारण करतात याबाबत सुयोग्य विकल्प निवडावा.

(३) दिव्यांगत्वाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अपलोड करावे.

(४) 'Submit' बटणवर क्लिक करून निवडलेला तपशील सादर करावा.

(५) सादर केलेला तपशील जाणून घेण्यासाठी अथवा संग्रही ठेवण्यासाठी स्वेच्छेनुसार तपशीलाची छपाई करावी.

३. उपरोक्त वेबलिंक **दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी १२.०० पासून दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** कार्यान्वित राहील.

४. विहित कालावधीत दिव्यांगत्वाचा विकल्प सादर न करणा-या उमेदवारांचा फक्त अराखीव पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येईल. तसेच, विहित मुदतीनंतर विकल्पाबाबतची कोणत्याही उमेदवाराची विनंती मान्य केली जाणार नाही.

५. दिव्यांग आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याकडून वितरित केलेले विहित नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र स्कॅन करुन अपलोड करणे, मुलाखत/प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

६. प्रस्तुत कार्यपध्दतीच्या अनुषंगाने विकल्प सादर करताना अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-२६७३-८८९ अथवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून आवश्यक मदत प्राप्त करून घेता येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग